Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-Accredited A

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे "अ" दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.net
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.net

Office of the Director
Board of Examinations & Evaluation
कार्यालय, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र परीक्षा/कापवमूमं/२०१७/

दिनांक : ०८.१२.२०१७

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

विषय : **उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी अध्यापकांना कार्यमूक्त करणेबाबत.**

महोदय,

मा. कुलपती कार्यालयाने निर्देशित केल्यानुसार तसेच मा. कुलपती कार्यालयाने आयोजित केलेल्या बैठकातील सूचनांच्या अनुषंगाने आणि मा. कुलगुरू महोदयांनी आदेशित केल्यानुसार आपणांस कळविण्यात येते की, ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१७ मध्ये होत असलेल्या सर्व परीक्षांचे निकाल महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूदीनुसार ३० दिवसांत घोषित करणे आवश्यक आहे.

उत्तरपत्रिका मूल्यांकनाचे कार्य संलग्नित महाविद्यालयातील सर्व अध्यापकांनी मिळून करावयाचे सांघिक कार्य आहे. त्यामुळे या कार्यात सर्व शिक्षकांचा सहभाग असायला हवा, तेंव्हाच उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन/मॉडरेशन वेळेत होऊन निकाल प्रक्रिया वेळेत होऊ शकते. उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनावर विद्यार्थ्यांचे पुढील भविष्य अवलंबून असते, त्यामुळे ही सर्व जबाबदारी शिक्षकांची आहे, आपल्या विद्यापीठाशी संलग्नित सर्व शिक्षकांचे या कार्यात नेहमीच उत्स्फूर्तपणे सहभाग असतो, त्यामुळे आपल्या विद्यापीठाचे निकाल नेहमी वेळेत लागतो, महाराष्ट्रातील निकाल लागण्याच्या सर्वात कमी कालावधीच्या क्रमवारीत आपले विद्यापीठ हे प्रथम पाच क्रमांकात आहे, याचे सर्व श्रेय आपल्या विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील सर्व अध्यापकांचे आहे.

म्हणून याद्वारे सर्व प्राचार्यांना आवाहन करण्यात येते की, दिनांक ११ डिसेंबर २०१७ पासून पूर्णवेळ एक आठवड्याच्या कालावधीसाठी आपल्या महाविद्यालयातील सर्व अध्यापकांना मूल्यांकनासाठी मूल्यांकन केंद्रावर रुजू होणेसाठी कार्यमूक्त करण्यात यावे. तसेच कार्यमूक्त करण्यात आलेल्या अध्यापकांना कार्यमूक्ती आदेशाची एक प्रत विद्यापीठास पाठवावी.

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे योग्य मूल्यमापन व्हावे, त्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होणे अध्यापकांच्या हाती असल्याने मूल्यांकनासाठी स्वयंप्रेरणेने सर्व मान्यताप्राप्त अध्यापकांनी मूल्यांकनाच्या कार्यात सहभाग नोंदवावा.

सबब, आपले स्तरावर सर्व अध्यापकांना आवाहन करण्यात यावे व मूल्यांकनाचे कार्य वेळेत पार पाडणेसाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला,

08/12

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ